जाहीर नोटीस
नमुना -१

सक्षम प्राधिकारी तथा, उपविभागीय अधिकारी, वाडा विभाग
वाडा, यांचे कार्यालय
प्र.क्र.भू.सं./कावि- १७१/२०२४
दिनांक ०२/०९/२०२४.

खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस.
ज्या अर्थी, मुख्याधिकारी , नगरपंचायत कार्यालय वाडा यांनी पाणीपुरवठा योजना या सार्वजनिक प्रयोजनासाठी शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण ०३/२०१५/ प्र.क्र.३४/अ-२/दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५, २४ जानेवारी २०१७ मधील तरतुदीनुसार अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने नगर पंचायत कार्यालय वाडा यांचे नावे घेण्याबाबत प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पालघर यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्या अर्थी, मा.जिल्हाधिकारी पालघर यांचे पत्र जा.क्र.भूसंपादन(समन्वय)/कक्ष-१/टे-१/सक्षम अधि.नियुक्ती / कावि-४९५/२०२४ दिनांक २३/०३/२०२४ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ व दिनांक २४ जानेवारी २०१७ आणि तदअनुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र.एलक्युएन ०१/२०१७ प्र.क्र.१२/अ-२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करुन पुढील कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्या अर्थी, आता

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी समक्ष प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वाडा विभाग वाडा याद्वारे
   अ) अनुसुची एक मध्ये नमुद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने नगर पंचायत कार्यालय वाडा यांचे नावे घेण्याबाबत जाहीर सुचना प्रसिध्द करीत आहे.

   ब) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा २०१३ कलम २६ ते ३० च्या शेड्युल -१ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी होणा-या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

   क) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे नगर पंचायत कार्यालय वाडा यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

२. संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपविभागीय अधिकारी/ भूसंपादन अधिकारी वाडा विभाग वाडा यांच्याकडे दाखल करावेत.

३. संमतीपत्राचा(विकल्प) विहीत नमुना उपविभागीय अधिकारी/भूसंपादन अधिकारी वाडा विभाग वाडा यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत/महामंडळाच्या प्राधिकृत अधिका-यामार्फत भूधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी, वाडा / उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) पालघर/मुख्याधिकारी नगरपंचायत कार्यालयात वाडा यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने संपादित करणेच्या आहेत, त्याचा तपशिल सोबत परिशिष्ट -२ प्रमाणे आहे.

(स्वाक्षरी)
सक्षम प्राधिकारी, तथा
उपविभागीय अधिकारी वाडा

## परिशिष्ठ-२

### प्रकल्पामध्ये समाविष्ठ खाजगी जमिनींचा तपशील

**मौजे-वाडा, ता.वाडा, जि.पालघर**

| अ.क्र. | गावाचे नाव | भूधारकाचे नाव | गट क्र./स.क्र. | भूधारणा पध्दती | गा.नं.७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वाडा | अलमास इरफान मोमीन<br>अल्ताफ अहमंद सो.पटेल<br>असिफा अहमंद पटेल | २९३/अ/१/१ | वर्ग -१ | १.७९.९० | ०.७०.०० |

मुख्याधिकारी नगर पंचायत वाडा

सक्षम प्राधिकारी तथा,
उपविभागीय अधिकारी वाडा